आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२१ जुलै २०२४ - रविवार

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी सरकारने आज सर्वपक्षीय बैठक दिल्लीत बोलावली होती. संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरळीत चालावं यासाठी सर्व राजकीय पक्षांनी सहकार्य करावं असं आवाहन सरकार तर्फे बैठकीत करण्यात आलं. केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, किरेन रिजिजू, अर्जुन राम मेघवाल जेपी नड्डा, चिराग पासवान, रामदास आठवले आणि काँग्रेस नेते जयराम रमेश, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल, द्रमुक नेते टी आर बाळू आणि तिरुची शिवा, AIMIM चे नेते असदुद्दीन ओवेसी हे या बैठकीला उपस्थित होते.

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून सुरू होणार असून उद्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन २०२३-२४ चा आर्थिक पाहणी अहवाल मांडतील. येत्या मंगळवारी २०२४-२५ वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प लोकसभेत सादर होईल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातला हा पहिलाच अर्थसंकल्प असेल.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचं सरकार येईल असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. ते आज पुण्यात भारतीय जनता पक्षाच्या महाअधिवेशनात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत होते. लोकसभा निवडणुकीच्या वेळी विरोधी पक्षांनी संविधान, महागाई आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत भाजपावर आरोप करताना खोटा प्रचार केला, तो पक्षनेते आणि कार्यकर्त्यांनी हा प्रचार खोडून काढला पाहीजे असं ते म्हणाले. मराठ्यांना

ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याबात शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी आपली मतं स्पष्ट करावीत असं ते म्हणाले.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही सकाळच्या सत्रात **पक्ष** कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं.

राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपानं हे महाअधिवेशन बोलावलं आहे. आज सकाळी अधिवेशनाचं उद्घाटन झालं. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, भाजपाचे नेते गिरीश महाजन, आशिष शेलार, पंकजा मुंडे यांच्यासह, भाजपाचे ५ हजारापेक्षा जास्त कार्यकर्ते आणि पदाधिकारी या अधिवेशनात सहभागी झाले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह समारोपाच्या सत्रात मार्गदर्शन करणार आहेत.

**<><><><><>**

जागतिक वारसा समितीचं ४६ वं अधिवेशन आजपासून नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं सुरू होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संध्याकाळी ७ वाजता अधिवेशनाचं उद्घाटन होणार आहे.

**<><><><><>**

राज्यात आज गुरू पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. आपल्या जीवनाला दिशा देणाऱ्या आणि मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना तसंच आध्यात्मिक गुरूंना वंदन करून आदरभाव व्यक्त करण्यासाठी आजचा दिवस साजरा केला जातो.

यानिमित्तानं राज्यात अनेक ठिकाणी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. शिर्डी इथं आयोजित गुरू पौर्णिमा उत्सवात, शताब्दी ध्वजाचं पूजन करण्यात आलं. अमरावतीमधल्या गुरुकुंज मोझरी इथं राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधीस्थळी पौर्णिमा उत्सव आयोजित करण्यात आला होता.

बुलढाणा जिल्ह्यातल्या शेगाव इथं गजानन महाराज संस्थानात भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. याशिवाय अनेक ठिकाणच्या शाळा, महाविद्यालयातही विशेष कार्यक्रम आयोजित केले गेले होते.

**<><><><><>**

वैद्यकीय क्षेत्रातल्या विद्यार्थ्यांनी आयुर्वेदातल्या सिद्धांतांचा अभ्यास करून या क्षेत्रात संशोधन करावं असं आवाहन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी काल वर्धा इथं केलं. वर्ध्याच्या दत्ता मेघे अभिमत विद्यापीठाच्या १५व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. या समारंभात वैद्यकीय, दंतविज्ञान, आयुर्वेद, भौतिकोपचार, परिचर्या, औषध निर्माणशास्त्र, पर्यायी उपचार शाखा आणि अन्य विद्याशाखेतल्या १ हजार ७२१ पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना दीक्षांत प्रमाणपत्र दिली गेली.

**<><><><><>**

राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांच्या फुटीनंतर, आमदार अपात्रेबाबत विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या विरोधात उद्धव ठाकरे गट आणि शरद पवार गटानं सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांवर येत्या मंगळवारी म्हणजेच २३ जुलैला सुनावणी होणार आहे. यासंदर्भात

झालेल्या मागच्या सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयानं राहुल नार्वेकर यांना संबंधित दस्तऐवज सादर करण्याचे निर्देश दिले होते. या सुनावणीत हे दस्तऐवज सादर केले जाण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

राज्याच्या विविध भागात आज पावसाचा जोर आहे.

मुंबई आणि उपनगरांत आज मुसळधार पावसानं अनेक ठिकाणी पाणी साचून वाहतूक कोंडी झाली. अंधेरी पूर्व आणि पश्चिम यांना जोडणारा अंधेरी सब वे, तसंच दादरच्या हिंदमाता भागात पाणी साचलं आहे. मुंबई आणि उपनगरांत गेल्या ४८ तासांपासून अधूनमधून जोरदार पाऊस पडत आहे. येत्या काही दिवसांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. गेल्या २४ तासांत मुंबईत ९१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली.

रत्नागिरी जिल्ह्यात आज अतिमुसळधार पाऊस कोसळत आहे. दुपारी दोन वाजताच्या स्थितीनुसार, खेड तालुक्यातली जगबुडी नदी धोका पातळीच्या वरून वाहत आहे. लांज्यातली काजळी नदी धोका पातळीच्या जवळ आहे. राजापुरातली कोदवली आणि लांज्यातली मुचकुंदी या नद्या इशारा पातळीच्या वरून वाहत आहेत.

मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांना पुढच्या २४ तासांसाठी रेड अलर्ट दिला असून ठाणे आणि कोल्हापूर जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे.

नवी मुंबई आणि परिसरात सकाळपासून मुसळधार पाऊस सुरू आहे.

भंडारा जिल्ह्यात काही ठिकाणी सकाळपासून रिम-झिम पाऊस सुरू आहे.तर काही ठिकाणी ढगाळ वातावरण आहे.

**<><><><><>**